**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाची ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर
- जनतेचा पैसा जनतेच्या, देशाच्या विकासावर प्रामाणिकपणे खर्च करण्याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- कृषी उत्पादनांचा शेतकऱ्यांना मिळणारा भाव आणि किरकोळ विक्री भावातली तफावत कमी करण्यासाठी केंद्र सरकार समिती स्थापन करणार
- राज्यात परतीच्या पावसामुळे अनेक जिल्ह्यात पिकांचं नुकसान

**आणि**

- न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारत पराभूत

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं ९९ उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांना नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून तर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना कामठीतून उमेदवारी दिली आहे. मंत्री गिरीश महाजन जामनेरमधून तर सुधीर मुनगंटीवार बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवतील. वांद्रे पश्चिम मधून आशीष शेलार, मलबार हिलमधून मंगल प्रभात लोढा, कुलाब्यातून राहुल नार्वेकर आणि भोकर विधानसभा मतदारसंघातून श्रीजया अशोक चव्हाण उमेदवार असतील. नाशिक पूर्वमधून राहुल ढिकले तर नाशिक पश्चिमला सीमा हिरे यांना उमेदवारी दिली आहे. सोलापूर शहर उत्तरमधून विजयकुमार देशमुख आणि सोलापूर दक्षिणमधून सुभाष देशमुख यांना उमेदवारी जाहीर केली आहे. श्रीगोंद्यातून

प्रतिभा पाचपुते, देवळीतून राजेश बकाणे, चिंचवडमधून शंकर जगताप, फुलंब्रीतून अनुराधा चव्हाण, इचलकरंजीतून राहुल आवाडे, केजमधून नमिता मुंदडा यांना उमेदवारी दिली आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत ज्या मतदारसंघात निवडून येण्याची शक्यता आहे, तिथं उमेदवार उभे करावेत, तसंच इतर ठिकाणी मराठा आरक्षणाला समर्थन देणाऱ्याला मतदान करावं, असं आवाहन मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी केलं. जालना जिल्ह्यातल्या आंतरवली सराटी इथं सभेत ते आज बोलत होते. कोणत्या मतदारसंघात मराठा समाजाची ताकद आहे, हे तपासणं गरजेचं आहे, असं जरांगे यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक दिवंगत विनायक मेटे यांच्या पत्नी डॉक्टर ज्योती मेटे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. बीड विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी आपण इच्छुक असून तसा प्रस्ताव पक्षाकडे दिल्याचं मेटे यांनी वार्ताहरांना सांगितलं. यावेळी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विजयसिंह मोहिते पाटील उपस्थित होते.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष भरत गावित यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित होते.

**<><><><><>**

वाशीम इथल्या वंचित बहुजन आघाडीच्या सिद्धार्थ देवळे यांनी आज मातोश्री इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. गेल्या निवडणुकीत

सिद्धार्थ देवळे यांनी २०१९ साली वाशीम विधानसभा मतदार संघातून वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून निवडणूक लढवली होती.

<><><><>

माजी आमदार परशुराम उपरकर यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वांद्रे इथल्या निवासस्थानी उपरकर यांनी पक्षप्रवेश केला.

<><><><>

भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी आज पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय जाहीर केला. दुसऱ्या कोणत्या पक्षात जाणार हे त्यांनी स्पष्ट केलं नसून याबाबत लवकरच निर्णय घेऊ, असं सांगितलं आहे.

<><><><>

राज्यात आचारसंहिता लागू झाल्यापासून सी व्हिजिल या ॲपवर आतापर्यंत ५७६ तक्रारी आल्या असून त्यातल्या ५६३ तक्रारी निकाली काढण्यात आल्याची माहिती अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉक्टर किरण कुलकर्णी यांनी दिली. आचारसंहिता लागू झाल्यानंतर शासकीय, सार्वजनिक, खासगी जागेतल्या विनापरवानगी लावलेल्या जवळपास सात लाख जाहिराती काढल्या, तसंच बेकायदेशीर पैसे, दारू, अंमली पदार्थ इत्यादी मिळून १४ कोटी ९० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचं कुलकर्णी यांनी सांगितलं.

<><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीत संपूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी केली जाणारी मतदान संयंत्रांची सरमिसळ प्रक्रिया आज मुंबई इथं पार पडली. मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातल्या ३६ विधानसभा मतदारसंघासाठी संयंत्रांची पहिल्या टप्प्यातली सरमिसळ प्रक्रिया पूर्ण झाली.

**बीडमधेही** जिल्ह्यातल्या सर्व ६ विधानसभा मतदार संघातल्या मतदान यंत्रांची पहिल्या टप्प्यातली सरमिसळ आज जिल्हाधिकारी तसंच जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांच्या उपस्थितीत करण्यात आली. सरमिसळ करण्यात आलेल्या या संयंत्रांची विधानसभा मतदारसंघनिहाय प्रत्यक्ष वितरणाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या ८ मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

जनतेचा पैसा जनतेच्या, देशाच्या विकासावर खर्च व्हायला हवा, याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी  म्हटलं आहे. ते आज उत्तर प्रदेशात वाराणसी इथं ६ हजार ७०० कोटी रुपयांच्या २३ बहुविध विकास प्रकल्पाचं उद्घाटन आणि पायाभरणी करताना बोलत होते. देशातल्या प्रत्येक कुटुंबाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी सरकार करत असलेल्या प्रयत्नांविषयी त्यांनी यावेळी सांगितलं. पायाभूत सुविधांमुळे नागरिकांचं जीवन सुलभ होण्यासोबतच रोजगारनिर्मिती होते, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

**होल्ड - बाईट - (२६ सेकंद)**

**<><><><><>**

कृषी उत्पादनं आणि बागायती उत्पादनांचा शेतकऱ्यांना मिळणारा भाव आणि या उत्पादनांची बाजारातली किरकोळ विक्री किंमत यातली तफावत कमी करण्यासाठी सरकार एक समिती स्थापन करणार आहे, अशी माहिती केंद्रीय

कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. ते आज नवी दिल्लीत कृषी परिषदेत बोलत होते. शेतकरी आपला भाजीपाला ५ रुपये किलो भावानं विकतात आणि किरकोळ बाजारात मात्र तो ५० रुपये किलो भावानं विकला जातो, ही तफावत कमी करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याचं काम ही समिती करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. कृषी संशोधनाचे फायदे प्रयोगशाळेपासून शेतापर्यंत पोहचवण्यासाठी पुढच्या महिन्यापासून 'कृषी चौपाल' उपक्रमाचा प्रारंभ केला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

राज्यात परतीच्या पावसानं जोर धरला असून अनेक जिल्ह्यात पिकांचं नुकसान झालं आहे. **अमरावती** जिल्ह्यात कालपासून झालेल्या पावसामुळे शेतात असलेल्या सोयाबिनला त्याचा फटका बसला आहे. काही शेतकऱ्यांनी सोयाबीन घरी आणलं असलं तरी शेतात पडून असलेलं सोयाबीन खराब होण्याची भीती आहे. काही ठिकाणी तुरीला आलेल्या फुलोऱ्याला मोठ्या प्रमाणात फटका बसण्याची शक्यता आहे. काल रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे **जालना** जिल्ह्यातल्या परतूर तालुक्यात निम्न दुधना प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरु आहे. याच्या १० दरवाज्यातून १६ हजार ७०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग होत असून प्रशासनानं नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. **रत्नागिरीत** काल घेतलेल्या विश्रांती नंतर आज दुपारनंतर पुन्हा विजांच्या कडकडाटासह पावसानं हजेरी लावली. **भंडारा** जिल्ह्यात काल झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतात पाणी साचलं असून कापून ठेवलेल्या धान पिकाचं नुकसान झालं. **नांदेड** जिल्ह्यात सुद्धा अतिवृष्टीची नोंद झाली. आज सकाळी अप्पर मानार धारणाचे ५ तर विष्णुपुरी प्रकल्पाचा १ दरवाजा उघडला आहे. यंदा १०६ पूर्णांक ९३ टक्के पावसाची नोंद झाली असून पावसानं सरसरी ओलांडल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझिलंड यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेच्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडनं आज भारताचा आठ गडी राखून पराभव करत मालिकेत १-० नं आघाडी घेतली. भारताचा दुसरा डाव काल ४६२ धावांवर संपल्यानंतर न्यूझीलंडसमोर विजयासाठी १०७ धावांचं लक्ष्य होतं. २ गड्यांच्या मोबदल्यात न्यूझीलंडनं हे लक्ष्य पूर्ण केलं.

**<><><><><>**

मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर काल बँकॉकहून आलेल्या एक प्रवाशाकडून सुमारे ८ किलोहून अधिक गांजा जप्त करण्यात आला असून या गांजाची किंमत अंदाजे ८ कोटी रुपये इतकी आहे. या प्रवाश्याने हा गांजा खेळणी आणि अन्नपदार्थांच्या डब्यात लपवला होता. या व्यक्तीला अंमली पदार्थ नियंत्रण कायद्याखाली अटक केली असून पुढचा तपास सुरु आहे.

**//<><><><><>//**